दिनांक २२/०३/२०२१

**प्रसिध्दी पत्रक**

**आरोपी लोकसेवक १) चरणसिंग आसारामसिंग राजपुत पद- ग्रामसेवक, नेमणुक-कोळघर,ता.जि.औरंगाबाद आरोपी खाजगी इसम २) ज्ञानेश्वर परमेश्वर आवारे, रा. कोळघर जि. औरंगाबाद यांनी ८,०००/- रु लाचेची स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद च्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी व आलोसे यांचे नावे, हुद्दा | :- | १) चरणसिंग आसारामसिंग राजपुत, वय ३६ वर्ष, पद- ग्रामसेवक, नेमणुक कोळघर , जि. औरंगाबाद रा. फ्लॅट नं बी-३ सारापुष्य, नाथ प्रांगण, गारखेडा औरंगाबाद<br>२) ज्ञानेश्वर तुकाराम आवारे उर्फ माऊली, वय ५५ वर्ष रा.कोळघर ता.जि. औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे करमाड, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री नंदकिशोर क्षीरसागर,पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | ८,०००/- रु स्विकृती |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे वडिलांचे मालकीची कोळघर गांवातील खरेदी केलेली मोकळी जागा तक्रारदार यांचे नावावर करण्यासाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | कोळघर गांव जवळ रस्त्यावर , ता.जि.औरंगाबाद येथे |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांचे वडीलांचे मालकीची कोळघर गांवातील खरेदी केलेली मोकळी जागा तक्रारदार यांचे नावे कोळघर येथील ग्रामपंचायत मध्ये असलेले गावठाण मिळकती रजिष्टरला व नमुना नं ८ मध्ये नोंदविण्यासाठी तक्रारदार यांचेकडे चरणसिंग राजपुत, ग्रामसेवक व ज्ञानेश्वर तुकाराम आवारे असे ८,०००/- रु लाचेची मागणी करित असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, १) आरोपी लोकसेवक चरणसिंग आसारामसिंग राजपुत, पद- ग्रामसेवक, २) आरोपी खाजगी इसम ज्ञानेश्वर तुकाराम आवारे यांनी तक्रारदार यांच्याकडे ८,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, आरोपी खाजगी इसम ज्ञानेश्वर तुकाराम आवारे रा. कोळघर, ता.जि. औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन ८,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन करमाड औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. नंदकिशोर क्षीरसागर यांनी केली आहे. त्यांना पोलीस अंमलदार अरुण उगले, मिलींद इप्पर, अशोक नागरगोजे, भुषण देसाई, उमेश जाधव, श्रीसुंदर, चालक अंमलदार देवसिंग ठाकुर यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

**(बी.व्ही.गावडे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग**
**औरंगाबाद.**